**<u>नियमीत दिवाणी दावा क्रं. ५९/१९९२ मधील नि. १४१ खाली आदेश</u>**

प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादीविरुध्द ठराव व ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**०२.** सदर दाव्यातील सदर दाव्यामध्ये वादीचे पूर्वीचे वकील यांनी अचानक वकीपत्र रद्द केलेमुळे मे. न्यायालयाने सदर दाव्यातील सर्व वादींना समज पाठविलेली होती. त्यापैकी वादी क्र. १ इ सौ. मंगल बाळू धोत्रे हे दि. २९/१०/२०१२ रोजी मयत असलेबाबत रिपोर्ट मे. न्यायालयामध्ये दाखल झालेला आहे. सदर वादी क्र. १ इ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे.

**०३.** तसेच प्रतिवादी क्र. १ कृष्णा तुकाराम शेटे हे दि. २८/०७/२०२० रोजी झाले असून त्यांचे वारसही दाव्याचे कामकाज पुढे चालवणेसाठी रेकार्डवर घेणे आवश्यक आहे. वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस रेकॉर्डवर मुदतीन न घेतल्यामुळे त्यांचेविरुध्द दावा अबेट झाला आहे. सबब, सदर वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे बाबतीत झालेला अबेट चा आदेश रद्द करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** सदर अर्जावर मागील बाजुस प्रतिवादीने म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीने असे नमुद केले आहे की, मयत वादी नं. १ इ व प्रतिवादी नं. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचा झालेला उशिर माफीचा अर्ज मंजूर झालेला नाही. त्यामुळे सदर अर्ज कायदयाने चालणारा नाही. सबब, सदरचा अर्ज हा नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** वादींचा युक्तीवाद ऐकला. वादी क्र. १ इ व प्रतिवादी क्र. १ यांचे वारस असल्यास त्यांचा खटला दाखल करण्याचा अथवा विरोधी पक्ष राहण्याचा अधिकार हा

जिवंत राहिला असल्याने त्या संदर्भात त्यांना रेकॉर्डवर घेण्याकरीता परवानगी न दिल्यास गुंतागुंत वाढू शकेल आणि अर्जाचा गुणदोषावर निर्णय देणेस अडचण निर्माण होईल. सदर कामी वादी क्र. १ इ सौ. मंगल बाळू धोत्रे हे दि. २९/१०/२०१२ रोजी व प्रतिवादी क्र. १ कृष्णा तुकाराम शेटे हे दि. २८/०७/२०२० रोजी मयत झाले आहेत असे वादीने नमुद केले आहे.

**०६.** प्रस्तुतच्या अर्जात नमुद केलेली कारणमिमांसा व दाव्यात निघुन गेलेला वेळ हे जुळून येत नसले तरी वादीचे वारस यांना त्यांची बाजू मांडण्याचा हक्क आहे. सबब, दाव्याचा अंतिम निर्णयाच्या कामी सुलभता येण्यासाठी व वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद अंतिमरित्या संपुष्टात येण्याच्या दृष्टीने हा अर्ज मंजूर करीत आहे. वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात आला.

NEHA K NAGARGOJE
Digitally signed by NEHA K NAGARGOJE
Date: 2024.07.06 11:31:33 +0530

दि.२९.०६.२०२४.
भोर .

(एन.के.नागरगोजे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
भोर

## CERTIFICATE

“I affirm that the contents of this P.D.F file Order are same word for word as per original Order

| | | |
|---|---|---|
| Name of the Steno | – | Smt. S.A.Sonawane |
| Court Name | – | Hon’ble Smt. N.K.Nagargoje |
| Date of Order/Judgment | – | 29/06/2024 |
| Date of Sign Order/Judgment | – | 05/07/2024 |
| Order uploaded on | – | 06/07/2024 |